# नियमित दिवाणी दावा क्र.१४८/२०२० मधील निशाणी क्र.६६ खाली आदेश

## (पारित दिनांक ०१ जुलै, २०२५)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १० अन्वये दाखल केलेला आहे. प्रतिवादीचे म्हणणेनुसार मौजे – कानगाव, ता. दौंड, जि. पुणे येथील शेतजमिन मिळकत गट क्र.९९८/१ पैकी ०१हे ८५आर बाबत जाहीर ठराव व मनाईकरीता मृत्युपत्र दस्त क्र.१२७८/१९९९ च्या आधारे दाखल केला असल्याचे नमुद केले. तसेच वादीने सदर मृत्युपत्राच्या दस्ताआधारे दिवाणी न्यायाधिश, व.स्तर, यांचे न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज क्र.६०/२०१६ हा प्रोबेट प्रमाणपत्र मिळणेसाठी दि.२६/०७/२०१६ रोजी दाखल केला आहे. सदरच्या अर्जास हरकती आल्याने त्या अर्जाचे रुपांतर दाव्यामध्ये होवुन त्याचा नियमित दिवाणी दावा २६०/२०१८ असा झाला. त्यानंतर सदरचा दावा बारामती न्यायालयातुन दौंड येथील न्यायालयात वर्ग झाल्याने त्याचा नियमित दिवाणी दावा क्र. ७६/२०२४ असा पडलेला असुन सदरचा दावा प्रलंबित असल्याचे नमुद केले.

०२. प्रतिवादी क्र.२ यांचे म्हणणेनुसार नियमित दिवाणी दावा क्र.७६/२०२४ हा दि.२६/०७/२०१६ रोजी वादीने दाखल केला असुन सदरचा दावादेखील याच प्रकरणातील मिळकतीबाबतच आहे व प्रलंबित आहे. त्यानंतर वादीने प्रस्तुतचा नियमित दिवाणी दावा क्र.१४८/२०२० हा दि.१९/०८/२०२० रोजी नियमित दिवाणी दावा क्र.७६/२०२४ मधील मिळकतीबाबतच मृत्युपत्राच्या आधारे दाखल केला आहे, परंतु प्रस्तुतचा दावा हा प्रिमॅच्युअर असुन वादीने यापुर्वीच नियमित दिवाणी दावा क्र.७६/२०२४ हा त्याच मुद्दयावर दाखल केल्याचे नमुद केले. प्रतिवादी क्र.२ चे म्हणणेनुसार दोन्ही दाव्यामध्ये एकच वादमुद्दा एकाच मिळकतीबाबत व त्याच पक्षकारांमध्ये प्रलंबित असुन नियमित दिवाणी दावा क्र.७६/२०२४ (ज्याचा जुना नियमित दिवाणी दावा क्र.२६०/२०१८) यामध्ये मृत्युपत्राबाबतचा मुद्दा प्रलंबित आहे. तसेच सदर दाव्यामध्येही मृत्युपत्राबाबतच वादीने मुद्दा उपस्थीत केला असुन वादी, प्रतिवादी यांच्यात

दावा मिळकतीबाबत यापुर्वीच नियमित दिवाणी दावा क्र.७६/२०२४ प्रलंबित असल्याने पुन्हा त्याच मुद्दयावर सदरचा दावा चालविणे कायदेशिर अडचणीचे होईल. त्यामुळे सदरचा दावा दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १० प्रमाणे स्थगित ठेवण्याची विनंती केली.

**०३.** सदर अर्जावर वादींनी निशाणी क्र.६८ वर त्यांचे म्हणणे दाखल केले. त्यांचे म्हणणेनुसार सदरचा अर्ज खरा, बरोबर, प्रामाणिकपणाचा नाही आणि अर्जातील नमुद कारणे खरे व बरोबर नाहीत. तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १० ची तरतुद सदर दाव्यास लागु होत नाही. दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, दौंड यांचे न्यायालयातील नियमित दिवाणी दावा क्र.७६/२०२४ हा प्रोबेट मिळणेसाठी दाखल केला आहे. तसेच सदरचा दावा हा निरंतर मनाई व जाहीर ठरावासाठी दाखल केलेला असल्यामुळे दोन्ही दाव्यामधील विनंती भिन्न स्वरुपाची आहेत. दोन्ही दावे स्वतंत्र चालणारे असुन दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १० प्रमाणे सदरच्या अर्जाच्या सुनावणीस कायद्याने स्थगिती देता येणार नाही. सदरचा दावा निशाणी ५ मनाईचे अर्जावर युक्तीवादाकामी असुन प्रतिवादी हे जाणीवपुर्वक वेगवेगळे अर्ज दाखल करुन दाव्याचे कामकाज लांबवित असल्याचे नमुद केले.

**०४.** वादीचे म्हणणेनुसार प्रतिवादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे अर्ज दाखल केला असता सदरचा अर्ज न्यायालयाने रद्द केला आहे. त्यानंतर सदर प्रकरण निशाणी ५ वरील मनाई अर्जावर युक्तीवादाकामी प्रलंबित असताना सदरचा स्थगितीचा अर्ज प्रतिवादीने दाखल केला आहे. सदरच्या अर्जास कोणतेही कायदेशिर मुद्दे दावा स्थगित करण्याबाबत दाखल केलेला नसल्याने सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

**०५.** अर्ज, म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादींचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. याठिकाणी प्रथम दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १० चा उहापोह करणे गरजेचे आहे.

**दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १० दाव्यांची स्थगिती –** *जर एखाद्या दाव्यामधील वादप्रश्न हा, त्याच पक्षकारांमध्ये अथवा त्याच हक्कान्वये वाद काढणा–या ज्या पक्षकारांच्या पोटीते अगर त्यांच्यापैकी कोणीही*

*हक्क सांगत असतील त्या पक्षकारांमध्ये पुर्वी सुरु केलेल्या दाव्यात देखील प्रत्यक्षपणे आणि सारतः वादग्रस्त असेल आणि असा दावा त्याच न्यायालयामध्ये किंवा ज्या प्रकारची दाद मागितली आहे ती मंजुर करण्याची अधिकारीता असलेल्या (भारतातील) अन्य कोणत्याही न्यायालयामध्ये अथवा (केंद्र शासनाने) स्थापन केलेल्या किंवा चालु ठेवलेल्या आणि तशीच अधिकारीता असलेल्या (भारताच्या) सिमेबाहेरील कोणत्याही न्यायालयामध्ये अथवा (सर्वोच्च न्यायालयापुढे संबंधित असेल तर, कोणत्याही न्यायालयाने या दाव्यांची संपरीक्षा पुढे चालु करता कामा नये).*

***सप्ष्टीकरण*** *–एखादा दावा परदेशी न्यायालयात प्रबंधित आहे म्हणुन त्याच वाद कारणावर आधारलेल्या दाव्यांची संपरीक्षा करण्यास न्यायालयांना प्रतिबंध होणार नाही.*

***<u>Section 10 of Civil Procedure Code -</u>***

*•Stay of suit - no Court shall proceed with the trial of any suit in which the matter in issue is also directly and substantially in issue in a previously instituted suit between the same parties, or between parties under whom they or any of them claim litigating under the same title where such suit is pending in the same or any other Court in India have jurisdiction to grant the relief claimed, or in any Court beyond the limits of India established or continued by the Central Government and having like jurisdiction, or before the Supreme Court.*

*•Explanation - The pendency of a suit in a foreign Court does not preclude the Courts in India from trying a suit founded on the same cause of action.*

***<u>Conditions for Section 10 of CPC -</u>***

*For the application of Section 10 of CPC, the following conditions must be satisfied:*

*•There must be two suits, one previously instituted and the other subsequently instituted.*

*•The matter in issue in the subsequent suit must be directly and substantially in issue in the previous suit.*

*•Both the suits must be between the same parties or their representatives.*

*•Such parties must be litigating under the same title in both the suits.*

*•The previously instituted suits must be pending in the same court in which the subsequent suit is brought or in any other court in India or beyond the limits of India having the like jurisdiction.*

*•The Court in which the previous suit is instituted must have jurisdiction to grant the relief claimed in the subsequent suit.*

**०६.** उपरोक्त कलमाचे व दाव्यातील कागदपत्रांचे अवलोकनावरुन सदरचा दावा हा वादीने एकुण १५ प्रतिवादींविरुध्द दाखल केला असुन सदर प्रतिवादींविरुध्द कायम मनाई हुकूम, अतिक्रमण करु नये, खरेदीखत दस्त क्र.३३३५/२०२० व दस्त क्र.२१६८/२०२० बंधनकारक नसल्याचा जाहीर ठराव होवुन मिळण्याची मागणी केली आहे.

**०७.** प्रस्तुत प्रकरणात वादीने दाखल केलेले प्रोबेट अप्लीकेशन हे आव्हानित झाल्याने त्याला बारामती न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्र.२६०/२०१८ व त्यानंतर दौंड न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्र.७६/२०२४ देण्यात आला. सदर दाव्यामध्ये वादी हा केवळ प्रतिवादी नामे तौफीक इसाक अत्तार व अहेमद रमजान अत्तार यांचेविरुध्द् पापाबाई इब्राहिम अत्तार यांनी करुन ठेवलेले मृत्युपत्र दस्त क्र.२७८/१९९९ बाबत प्रोबेट मागत आहे. एकंदरीत नियमित दिवाणी दावा क्र.१४८/२०२० व नियमित दिवाणी दावा क्र.७६/२०२४ मधील पक्षकार हे वेगवेगळे असुन दोन्ही दाव्यातील वादीने मागणी केलेल्या प्रार्थना भिन्न स्वरुपाच्या आहेत.

**०८.** प्रस्तुत प्रकरणात वादी हे केवळ मनाईचा हुकूम व जाहीर ठराव मागत आहेत परंतु, मृत्युपत्राचे दस्ताचे प्रोबेट अथवा त्याचे वैधतेबाबत कोणतीही मागणी करीत नाहीत. त्यामुळे दोन्ही

दाव्यातील मागण्या ह्या वेगवेगळ्या आहेत. जरी सदर दोन्ही दाव्यातील सक्षम न्यायालयात चालु असले तरी, दोन्ही दाव्यातील वादमुद्दे हे निश्चीतच भिन्न आहेत.

०९. प्रतिवादींनी त्यांचे युक्तीवादात नमुद केले की, नियमित दिवाणी दावा क्र.७६/२०२४ मध्ये न्यायालयाने ''मृत्युपत्र कायदेशिर आहे का?'' हा वादमुद्दा निश्चीत केला आहे व सदर नियमित दिवाणी दावा क्र.१४८/२०२० मधील परीच्छेद क्र.२ ते ६ मध्ये वादी हा मृत्युपत्राआधारे जाहीर ठराव मागत आहे. प्रतिवादींनी त्यांचे युक्तीवादापुष्टयर्थ **National Institute of Mental Health and Ors. Vs. Parmeshwar, AIR 2005 SC 242** या प्रकरणातील निर्णयाचा आधार घेतला. सदर प्रकरणात न्यायालयाने दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १० चा उद्देश काय आहे, याबाबत मत व्यक्त केले आहे. न्यायालयाने *"Sec. 10 would apply only if there is identity of the matter in issue in both the suits, meaning thereby, that the whole of subject matter in both the proceedings is identical".*

वादीचे विधीज्ञांनी सदर न्यायनिर्णया हा प्रकरणात लागु होत नसल्याचे नमुद केले. उपरोक्त न्यायनिर्णयाचे व प्रतिवादींचे युक्तीवादाचे अवलोकन केले असता सदर न्यायनिर्णयाचा आदर ठेवुन प्रस्तुत प्रकरणात जरी वादी हा मृत्युपत्राआधारे ते मालक व ताबेदार आहे म्हणतो परंतु, मृत्युपत्र वैध आहे किंवा अवैध आहे, याबाबत मागणी करीत नाही. त्यामुळे प्रस्तुत दाव्यातील प्रार्थना व नियमित दिवाणी दावा क्र.७६/२०२४ मधील वादमुद्दे वेगवेगळे आहेत. तसेच सदर दोन्ही दाव्यातील वादमुद्दे हे एकसारखे निश्चीतच नाहीत. त्यामुळे उपरोक्त न्यायनिर्णय हा प्रस्तुत प्रकरणात तंतोतंत लागु होत नाही. प्रस्तुत प्रकरणात वादीला केवळ त्यांचा ताबा सिध्द करणे आहे व अतिक्रमण सिध्द करावयाचे आहे. मृत्युपत्राचे वैधतेबाबतचा मुद्दा या दाव्यामध्ये नाही. महत्वाची बाब म्हणजे प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी हे दावा मिळकत विक्री करीत आहेत व सतत मिळकतीचे हस्तांतरण होत आहे. त्यामुळे वादीने सदरचा दावा दाखल केला आहे.

१०. उपरोक्त चर्चेवरुन सदरचा प्रतिवादी क्र.२ यांचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित नाही. करीता, मी खालील आदेश पारीत करतो –

# आदेश

प्रतिवादी क्र.२ यांचा निशाणी ६६ वरील अर्ज नामंजुर करण्यात येतो.

SHAILENDRA NANDKISHOR PATIL
Digitally signed by SHAILENDRA NANDKISHOR PATIL
Date: 2025.07.03 17:02:08 +0530

दौंड, (एस.एन. पाटील)

दि.०१/०७/२०२५ २रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

दौंड, जि. पुणे

## CERTIFICATE

"I affirm that, the contents of this PDF file judgment/order are same word for word as per original order/judgment"

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | M.M. Chintale |
| Court name | : | Hon'ble S.N. Patil<br>$2^{nd}$ Jt. Civil Judge, Jr. Div. Daund,<br>Tq. Daund, Dist. Pune |
| Order signed by<br>Presiding Officer on | : | 01.07.2025 |
| Order uploaded on | : | 03.07.2025 |